# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.10.2025** **वारःगुरुवार**

1. केंद्रिय मंत्रिमंडळाकडून महत्त्वाचे लोकाभिमुख निर्णय, रबी पिकांसाठी किमान आधारभूत किंमतीत वाढ, तर महागाई भत्त्यातही वाढ
2. रिझर्व्ह बँकेकडून रेपो दर जैसे थे, जनधन खातेधारकांना मोबाईल, इंटरनेट सुविधा मोफत उपलब्ध होणार
3. महात्मा गांधी, लाल बहादूर शास्त्री यांना जयंतीनिमित्त देशभरातून आदरांजली
4. देशभरात नवरात्रोत्सवाची सांगता, विजयादशमीचा उत्साह, राष्ट्रपती, पंतप्रधानांकडून शुभेच्छा
5. त्याग, निस्वार्थ सेवा आणि राष्ट्रनिर्माणात सक्रीय राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी सोहळ्यात सरसंघचालकाचं संबोधन. आणि
6. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी क्रिकेट मालिकेला आजपासून सुरुवात

**केंद्र निर्णय**

केंद्रीय मंत्रिमंडळाने, डाळींच्या उत्पादनासाठी आत्मनिर्भर अभियानाला काल मंजुरी दिली. देशांतर्गत डाळीच्या उत्पादनात वाढ करणे आणि स्वयंपूर्ण होणं असा या अभियानाचा उद्देश आहे. दिल्लीमध्ये काल झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी वार्ताहरांना ही माहिती दिली. 2025 ते 2031 या सहा वर्षांच्या कालावधीमध्ये हे अभियान राबवले जाणार असून, त्यासाठी 11 हजार 440 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्याशिवाय, 2026-27 सालच्या विपणन हंगामासाठी सर्व अनिवार्य रबी पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. त्यामध्ये करडई, मसूर, मोहरी, हरभरा, बार्ली, गहू या धान्यांचा समावेश आहे.

त्याशिवाय आर्थिक व्यवहारांसंबंधित मंत्रिमंडळ समितीने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्ता आणि निवृत्तीधारकांच्या महागाई सवलतीमध्ये तीन टक्के वाढ करण्याला काल मान्यता देण्यात आली. यामुळं एकंदर महागाई भत्ता 58 टक्के होईल. त्याचा फायदा जवळपास पन्नास लाख केंद्र सरकारी कर्मचारी तसंच थोडेकमी 69 लाख निवृत्तीवेतनधारकांना होणार आहे. या वर्षीच्या एक जुलैपासून हा निर्णय लागू होणार आहे.

याच बैठकीत, आर्थिक व्यवहारासंबंधित मंत्रिमंडळ समितीने देशभरात 5 हजार 862 कोटी रुपयांपेक्षा अधिक मूल्याच्या नव्या 57 केंद्रिय विद्यालयांना मान्यता दिली आहे. त्याचा फायदा 87 हजार विद्यार्थ्यांना होणार आहे. त्यासाठी 4 हजार 600 शिक्षकांची नवीन पदे निर्माण केली जाणार असल्याची माहिती वैष्णव यांनी दिली. या निर्णयांविषयी पंतप्रधानांनी समाधान व्यक्त केलं असून, डाळींबाबतच्या निर्णयामुळे स्वयंपूर्ण होण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेला बळकटी मिळणार आहे अशी प्रतिक्रिया त्यांनी समाजमाध्यमांवरील संदेशात व्यक्त केली आहे. त्याशिवाय नव्या केंद्रिय विद्यालयांची स्थापना ही दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता वाढवण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**वैष्णव-तंत्रज्ञान संस्था**

केंद्रिय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आज दिल्लीत राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान संस्था डिजीटल विद्यापीठ मंचाचे उद्घाटन करणार आहेत. उच्च गुणवत्ता डिजीटल शिक्षणाच्या उपलब्धतेचे लोकशाहीकरण करण्यासाठी या मंचाची निर्मिती केली आहे. यावेळी वैष्णव यांच्या हस्ते पाच नव्या केंद्रांचे दूरस्थ प्रणालीद्वारे उद्घाटन देखील होणार आहे.

**महात्मा गांधी जयंती**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आणि देशाचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांना त्यांच्या जयंतीनिमित्त देशभरातून आदरांजली वाहिली जात आहे. गांधी जयंतीनिमित्त देशभरात तसंच भारतीय दूतावासांमध्येही यानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. दिल्लीत राजघाट इथल्या महात्माजींच्या समाधीस्थळी सर्व धर्म प्रार्थना सभेचं आयोजन करण्यात आलं आहे. दरम्यान, काही वेळापुर्वी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी राजघाटावर बापूजींच्या समाधीस्थळावर श्रद्धांजली वाहिली. गांधी जयंतीचे औचित्य साधून, आज जागतिक पातळीवर आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस पाळण्यात येणार आहे.

**मुर्मू-गांधी**

महात्मा गांधी यांच्या 156व्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. त्यांनी दिलेल्या संदेशात, महात्मा गांधी यांचे आदर्श आणि मूल्य यांना समर्पित करण्याचा हा दिवस आहे असं नमूद केलं.

**पंतप्रधान-शास्त्री-गांधी-जयंती**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांना 121 व्या जयंतीनिमित्त आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना 156 व्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली. समाजमाध्यमावरून दिलेल्या संदेशात पंतप्रधानांनी, लाल बहादूर शास्त्री यांच्या सचोटी, नम्रता आणि दृढनिश्चयाने आव्हानात्मक काळात राष्ट्राला बळकटी मिळाल्याचं नमूद केलं. तर ज्यांच्या आदर्शांमुळे मानवी इतिहासाचा मार्ग बदलला अशा असाधारण जीवनाला आदरांजली वाहण्याची संधी म्हणजे गांधी जयंती. गांधीजींच्या विचारसरणीचा गौरव करताना, धैर्य आणि साधेपणा मोठ्या बदलाचे साधन होऊ शकतात हे त्यांनी दाखवून दिले. विकसित राष्ट्राचे स्वप्न साकारण्यासाठी राष्ट्र त्यांच्याच मार्गाचे अनुसरण करत राहील असं मोदी यांनी संदेशात म्हटलं आहे.

**विजयादशमी**

देशभरात आज विजयादशमी म्हणजेच दसऱ्याचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. आज नवरात्र आणि बंगाली बांधवांच्या दुर्गापुजा यांचा समारोप होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज दिल्लीत लाल किल्ला परिसरातील माधव दास पार्क इथं दसरा सोहळ्याला उपस्थित राहाणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदीदेखील दिल्लीतील आयपी एक्सटेंशन रामलीला समितीने आयोजित केलेल्या दसरा सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

**पंतप्रधान-शुभेच्छा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. समाज माध्यमांवरील संदेशात, वाईट आणि असत्यावर चांगल्याचा आणि नीतिमत्तेच्या विजयाचा हा उत्सव असून, धैर्य, ज्ञान आणि भक्ती नागरिकांना सन्मार्ग दाखवत राहो अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या आहेत.

**संघ शताब्दी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या समारंभ आज सकाळी नागपूरातील रेशीमबाग इथं माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या उपस्थितीत होणार आहे. या निमित्त संघस्वयंसेवकांचे संचलन होणार आहे, तसंच सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवत यांचं प्रमुख भाषण होणार आहे. या सोहळ्याला देशविदेशातील मान्यवरांना आमंत्रित करण्यात आलं आहे. शताब्दी वर्षानिमित्तच्या या विशेष कार्यक्रमात 21 हजार स्वयंसेवक उपस्थित राहाण्याची अपेक्षा आहे. त्याव्यतिरिक्त संघाच्या पंच परिवर्तन कार्यक्रमाचा भाग म्हणून देशभरातल्या शहरी आणि ग्रामीण मंडळ आणि वस्ती पातळीवर हिंदू संमेलनांचं आयोजन कऱण्यात येणार आहे. या अंतर्गत स्वयंसेवकांकडून गृहसंपर्क मोहीम राबवण्यात येणार आहे.

**पंतप्रधान**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा, शंभर वर्षांचा गौरवशाली प्रवास हा, त्याग, निःस्वार्थ सेवा, राष्ट्रनिर्माण आणि शिस्त यांचा अनोखा संगम आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल नवी दिल्ली इथं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जन्मशताब्दी

समारंभात बोलत होते. मोदी यांनी संघ संस्थापक, डॉक्टर केशव हेडगेवार यांचं स्मरण करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. संकटकाळी मदतीसाठी सर्वप्रथम धावून जाणाऱ्या स्वयंसेवकांबद्दल त्यांनी आदर व्यक्त केला. यावेळी एका विशेष टपाल तिकीटाचं आणि नाण्याचं प्रकाशन पंतप्रधानांच्या हस्ते झालं. केंद्रीय सांस्कृतिक कार्यमंत्री गजेंद्रसिंह शेखावत तसंच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबळे कार्यक्रमाला उपस्थित होते.

**आदिवासी ग्रामसभा**

देशभरातल्या एक लाख आदिवासीबहुल गावांमध्ये आज विशेष ग्रामसभेचं आयोजन करण्यात येणार असून, तिथे औपचारिकपणे जनजातीय ग्राम विजन 2030 या घोषणेचा स्वीकार करतील. आदिवासी व्यवहार मंत्रालयाने सुरू केलेल्या आदि कर्मयोगी अभियानाचा भाग असलेला हा जगातील सर्वात मोठा आदिवासी नेतृत्व कार्यक्रम आहे. यामध्ये 30 राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशातील 11 कोटी नागरिकांचा समावेश आहे.

**बुद्धिबळ**

आंध्र प्रदेश इथं सुरू असलेल्या 62व्या राष्ट्रीय बुद्धिबळ करंडक स्पर्धेत काल, ग्रँड मास्टर पी. इनियन याने काल विजयाला गवसणी घातली. इनियन 11 फेऱ्यांमध्ये अपराजित राहात त्याने विजेतेपद मिळवले. तर आंतरराष्ट्रीय मास्टर एच. गौतम कृष्णा याने दुसरे स्थान मिळवले. ग्रँडमास्टर शशीकिरण कृष्णन यांनी सर्वाधिक टाय ब्रेक मिळवत तिसरे स्थान पटकावले.

**क्रिकेट**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी क्रिकेट मालिकेला आजपासून सुरुवात होत आहे. आजचा सामना अहमदाबादमधील प्रतिष्ठित नरेंद्र मोदी स्टेडियमवर सकाळी 9.30 वाजता खेळला जाईल.

**महिला-क्रिकेट**

महिलांच्या मर्यादित षटकांच्या विश्वचषक स्पर्धेत काल ऑस्ट्रेलियाने इंदूरच्या होळकर क्रिकेट स्टेडियमवर न्यूझीलंडचा 89 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने 326 धावा केल्या. प्रत्युत्तरात, न्यूझीलंडचा संघ फक्त 237 धावा करू शकला.

# या बरोबरच हे बातमीपत्र संपलं.

# नमस्कार